महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

विशेष पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

दिनांक : ०२/०६/२०२३

---

**बनावट भारतीय चलन विक्री करिता बाळगुन असलेल्या आरोपीस ताब्यात घेवुन ५०० रु दराच्या ४,८२,०००/- रु किमंतीच्या ९६४ नग बनावट नोटा केल्या जप्त**

**स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळची कारवाई**

दिनांक ०१/०६/२०२३ रोजी मा. पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना गोपनिय बातमीदाराने बातमी दिली की, एक इसम पुसद येथे खऱ्या नोटांचे मोबदल्यात ५००/- रु रकमेच्या पाचपट नोटा विक्री करीत असुन सदर इसम हा दिनांक ०१/०६/२०२२ रोजी चे रात्री दरम्यान वाशिम येथुन मारवाडी फाटा मार्गे पुसद येथे येणार आहे अशा खबरेवरुन मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी सदर इसमांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पोलीस निरीक्षक प्रदिप परदेशी स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ व त्यांचे अधिनस्त पथकास दिले वरुन पुसद येथे कॅम्प करुन असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने प्राप्त गोपनिय माहितीची खातरजमा करुन कारवाई करण्यासाठी पुसद वाशीम रोडवरील मारवाडी फाटा येथे रात्री दरम्यान नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी करणे सुरु केले त्यातच गोपनीय माहिती प्रमाणे वर्णनाचा एक इसम हिरो डेस्टीनी मोपेड क्रमांक एम.एच. २९ बि.वाय. ८६३७ ने येतांना दिसल्याने त्यास पथकातील पो.स्टाफ चे मदतीने थांबवुन त्याचा नांव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नांव **विशाल नागोराव पवार वय ३४ वर्षे, रा. खामनवाडी पोस्ट कासोळा ता. महागांव ह.मु. धनराज फर्नीचर गांधीनगर पुसद जि. यवतमाळ** असे सांगीतल्यने त्याचे ताब्यात असलेले वाहन व बॅगची झडती घेवुन त्याचे कब्जात ५०० रु दराच्या बनावट नोटा मिळुन आल्याने त्याचेकडे अधिक चौकशी करुन तो राहत असलेल्या किरायाचे घराची झडती घेवुन तो विक्री करीता बाळगुन असलेल्या भारतीय चलनातील ५००/- रु किंमतीच्या एकुण ९६४ नग बनावट नोटा कि. ४,८२,०००/- रु च्या व हिरो डेस्टीनी मोपेड क्रमांक एम.एच. २९ बि.वाय. ८६३७ किंमत अं ६०,०००/- रु चे जप्त करण्यात आल्या आहेत.

नमुद प्रकरणात आरोपी **विशाल नागोराव पवार याचे विरुध्द** पोलीस स्टेशन खंडाळा येथे भादवि कलम ४८९ (ब) (क), १२० (ब), ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस स्टेशन खंडाळा हे करित आहेत. गुन्हयाची व्याप्ती मोठी असल्याने गुन्हयात सहभागी इतर आरोपीतांचे शोधार्थ स्थानिक गुन्हे शाखेची इतर पथके कार्यरत असुन १) विनोद गंगाराम राठोड वय ४२ रा. सुभाषवार्ड पुसद, २) बालु बाबुराव कांबळे वय ४६ रा. परळी वैजनाथ जि. बिड या दोन संशयीतांना स्थागुशा कडील पथकाने नुकतेच ताब्यात घेतले असुन अधिक तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पंकज अतुलकर, प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, सपोनि अमोल सांगळे, पोउपनि सागर भारस्कर स्थागुशा, पोहवा सुभाष जाधव, नापोकॉ कुणाल मुंडोकार, नापोकॉ सोहेल मिर्झा, पोशी मोहम्मद ताज, पोशी सुनिल पंडागळे , चालक पोशी दिगांबर गिते सर्व स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी अथक परिश्रम करुन पार पाडली आहे.

( डॉ. पवन बन्सोड )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

Scanned with OKEN Scanner